एनओएफसीआय ०३११०९
आरबीआय/२००९-१०/२०५
डीसीएम (पीएलजी) क्र. २७०१/१०.०१.०३/२००९-१०                    ऑक्टोबर ३०, २००९

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक
सर्व सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील बॅंका

महोदय,

बॅंकाच्या चलन व्यवस्थापन कार्यकृतींसाठी बॅंकांव्दारे नोडल ऑफिसर्सची नेमणुक

श्रीमती उषा थोरात, डेप्युटी गव्हर्नर, भारतीय रिझर्व बॅंक ह्यांच्या अध्यक्षतेखाली आलेल्या चलन व्यवस्थापनावरील उच्च स्तरीय गटाने त्याचा अहवाल ऑगस्ट २००९ मध्ये सादर केला. ह्या गटाने, इतर बाबींबरोबर, जनतेला खऱ्या व स्वच्छ नोटा मिळतील ह्याची खात्री करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व सुरक्षा प्रणाली वापरण्यात जोर दिला होता.

२)वरील उद्दिष्टासाठी बॅंकांनी प्राधान्य द्यावे ह्या उद्देशाने प्रायोजित केले जात आहे की, करन्सी चेक ठेवणाऱ्या सर्व बॅंकांनी चलन व्यवस्थापनाची जबाबदारी, महाव्यवस्थापक स्तरापेक्षा कमी स्तर नसलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडे सोपवावी व हा अधिकारी रिझर्व बॅंकेसाठी नोडल संपर्क बिंदु असेल व तो भारतीय रिझर्व बॅंकेने करन्सी चेकवर टाकलेल्या दायित्वांसाठी जबाबदार असेल. इतर बॅंकाही ही जबाबदारी पुरेशा वरिष्ठ अधिकाऱ्यावर सोपवितील.

३) बॅंकांनी अशा नोडल ऑफिसर्सची नावे, त्याचा/पत्ता, संपर्क क्रमांक (लॅंड लाईन व मोबाई, फॅक्स क्रमांक), ईमेल ॲड्रेस आम्हाला लवकरात लवकर कळवावीत.

४) ह्या उच्च स्तरीय गटाच्या अहवालावर आधारित सविस्तर मार्गदर्शक तत्वे वेगळी पाठविली जात आहेत.

आपली

(रश्मी फौजदार)
महाव्यवस्थापक